मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी–चिंचवड | सोमवार, दि. 29 जून 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मालमत्ताकर वसुलीत मोठी वाढ

## 3.8 लाखांहून अधिक मालमत्ताधारकांचा कर भरणा; ऑनलाईन व विविध सवलतींचा मोठ्या प्रमाणावर लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागामार्फत मालमत्ताकर भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सवलत योजनांना शहरातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंत सुमारे 3 लाख 80 हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला असून, त्यापैकी 3 लाख 62 हजार 57 जणांनी विविध सवलतींचा लाभ घेतला आहे.



महापालिकेकडून 30 जून 2026 पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. ऑनलाईन आगाऊ कर भरल्यावर मिळणाऱ्या 10 टक्के सवलतीला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला असून, 3 लाख 8 हजार 453 जणांनी डिजिटल माध्यमातून कराचा भरणा केला आहे.

आगाऊ कर भरणा, महिला मालमत्ताधारक, दिव्यांग, माजी सैनिक, शौर्य पदकधारक, पर्यावरणपूरक उपक्रम राबविणारे तसेच प्रामाणिक करदाते अशा विविध गटांनाही महापालिकेच्या सवलत योजनांचा लाभ मिळाला आहे. शहरात 7 लाख 44 हजारांहून अधिक मालमत्तांची नोंद असून, त्यापैकी 3 लाख 80 हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी आतापर्यंत 436 कोटी 20 लाख रुपयांचा कर भरला आहे, अशी माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

विविध सवलती, ऑनलाइन करभरणा सुविधा तसेच, विभागीय करसंकलन कार्यालयांमार्फत आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उपलब्ध सवलतींचा लाभ अधिकाधिक मालमत्ताधारकांनी घ्यावा. तीस जूनपूर्वी मालमत्ताकराचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

### मालमत्ताकर भरून महापालिकेस सहकार्य करा

**» करदात्यांच्या सोयीसाठी विविध सवलती, ऑनलाइन करभरणा सुविधा तसेच, विभागीय करसंकलन कार्यालयांमार्फत आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उपलब्ध सवलतींचा लाभ अधिकाधिक मालमत्ताधारकांनी घ्यावा. तीस जूनपूर्वी मालमत्ताकराचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.**

# 'अप्पू घर' होणार अत्याधुनिक; सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या दरात नव्या सुविधांचा संकल्प

## ‘अप्पू घर’चा चेहरामोहरा बदलणार; आधुनिक सुविधांसह पर्यटकांचे होणार स्वागत : स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील अत्यंत लोकप्रिय पर्यटन स्थळ असलेल्या ‘अप्पू घरा’ चा लवकरच कायापालट करण्यावर आमचा भर असणार आहे. काळाची गरज ओळखून या ठिकाणी आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अप्पू घराच्या आधुनिकीकरणाचा मानस स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी व्यक्त केला आहे.






या संदर्भात माहिती देताना सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, “अप्पू घर हे सर्वसामान्यांसाठी पर्यटनाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. सध्याच्या महागड्या अम्युझमेंट पार्क्सच्या तुलनेत अप्पू घराचे तिकीट दर अत्यंत कमी आहेत. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी विशेष बदल झाले नव्हते. आता तेथील राईड्स आणि सुखसोयींचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे.”

अप्पू घराच्या विकासकामांबाबत बोलताना बारणे यांनी स्पष्ट केले की, जरी सुविधा आधुनिक केल्या तरी त्याचे तिकीट दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशाच प्रकारे ठेवले जातील. कामगारांच्या शहरात सामान्य नागरिकांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, यासाठी हे दर मर्यादित ठेवण्यावर महापालिकेचा भर असेल.

अप्पू घरासाठी २०३१ पर्यंत संबंधित कंत्राटदारावर करार करण्यात आला आहे. यामध्ये वॉटर पार्क आणि इतर नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा समावेश आहे. सध्याच्या कामांचा आढावा घेताना बारणे म्हणाले की, “या प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या निधीतून ऑक्टोबरपर्यंतची कामे वेगाने पूर्ण केली जातील. कामाचा दर्जा उत्तम असावा आणि पर्यटकांना एक दर्जेदार अनुभव मिळावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.” अप्पू घराला पुनर्जीवित करून त्याला पुन्हा एकदा शहराचे ‘दिमाखदार’ आकर्षण म्हणून विकसित करण्याचा संकल्प सभापतींनी यावेळी व्यक्त केला.

### आधुनिकीकरण करताना सर्वसामान्यांचा विचार

**» अप्पू घराच्या विकासकामांबाबत बोलताना बारणे यांनी स्पष्ट केले की, जरी सुविधा आधुनिक केल्या तरी त्याचे तिकीट दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशाच प्रकारे ठेवले जातील. कामगारांच्या शहरात सामान्य नागरिकांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, यासाठी हे दर मर्यादित ठेवण्यावर महापालिकेचा भर असेल.**

# पिंपरी-चिंचवडच्या पाणीप्रश्नी राज्य सरकार ‘ॲक्टिव्ह मोड’वर..!

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची 30 जूनला आढावा बैठक; भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. विधानसभा पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी विखे-पाटील यांची भेट घेऊन शहरासाठी प्रस्तावित पाणी आरक्षण प्रस्तावांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.

यावेळी आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि भविष्यातील वाढती पाण्याची गरज याकडे लक्ष वेधले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंदाजानुसार सन २०४१ पर्यंत शहराची लोकसंख्या सुमारे ९६ लाखांपर्यंत पोहोचणार असल्याने दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी तातडीने नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.




> “पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन आजच करणे आवश्यक आहे. शहराला दीर्घकालीन जलसुरक्षा मिळावी यासाठी विविध पाणी आरक्षण प्रस्ताव शासनाकडे मांडले आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक बोलावण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीतून ठोस निर्णय होऊन शहरातील नागरिकांना भविष्यात पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### शहराच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाचे पाऊल

**» पिंपरी-चिंचवड शहराच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. आमदार महेश लांडगे यांनी आंद्रा धरणातून अतिरिक्त १ टीएमसी आणि ठोकरवाडी धरणातून सुमारे ५ टीएमसी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव मांडला आहे. ३० जून रोजी होणाऱ्या बैठकीत या प्रस्तावांची तांत्रिक व प्रशासकीय छाननी केली जाणार आहे. तसेच, ३ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाचाही आढावा घेतला जाणार असून, शहराच्या भविष्यातील जलसुरक्षेसाठी या बैठका महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.**

निवेदनात आंद्रा धरणातून अतिरिक्त १ टीएमसी पाणी आरक्षण, ठोकरवाडी धरणातून सुमारे ५ टीएमसी पाणी उपलब्ध करून देणे या प्रस्तावांचा समावेश आहे. या प्रस्तावांचा एकत्रित विचार करून भविष्यातील पाणी गरजांचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित तांत्रिक यंत्रणांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी आमदार लांडगे यांनी केली होती.

त्यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत येत्या मंगळवारी, दि. ३० जून २०२६ रोजी संबंधित विभागांची आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीत विविध पाणी आरक्षण प्रस्तावांच्या तांत्रिक, प्रशासकीय आणि धोरणात्मक बाबींवर सविस्तर चर्चा होणार आहे. शहरातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण असून, भविष्यातील पाणीपुरवठा नियोजनासाठी ती निर्णायक ठरणार आहे.

विशेष म्हणजे, शहराच्या पाणी पुरवठ्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाबाबतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये दि. ३ जुलै २०२६ रोजी सविस्तर आढावा बैठक होणार आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये रस्ते खोदाईवर प्रश्नचिन्ह; स्मार्ट सिटी प्रकल्पाला पावसाळ्यात विशेष परवानगी

## आयुक्तांच्या आदेशाला छेद देत 38 किमी खोदाईस मंजुरी; इतर प्रकल्पांना बंदी असताना निर्णयावर वाद निर्माण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यात शहरातील नागरिकांना खड्डे आणि चिखलाचा सामना करावा लागू नये, यासाठी दरवर्षी १५ मेनंतर शहरातील रस्ते व पदपथ खोदकाम बंद केले जाते. यावर्षीही आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी खोदकाम बंदचे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र, या आदेशाला त्यांच्याच मान्यतेने स्मार्ट सिटी कंपनीकडून केराची टोपली दाखवल्याचा प्रकार समोर आला. ऐन पावसाळ्यात भूमिगत फायबर ऑप्टिकल केबल टाकण्यासाठी ठेकेदाराला रस्ते खोदकाम करण्यास विशेष परवानगी देण्यात आली आहे. यामुळे इतर संस्था, खासगी नेटवर्किंग कंपन्या तसेच, नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

महापालिकेचे स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज विभाग तसेच, एमएनजीएल, महावितरण आणि अनेक खासगी नेटवर्किंग कंपन्या विविध सेवावाहिन्या व केबल टाकण्यासाठी रस्ते खोदतात. त्यासाठी महापालिकेकडून शुल्क आकारून परवानगी दिली जाते. खोदाई आणि निकृष्ट दर्जाच्या रस्ते दुरुस्तीच्या कामांमुळे दरवर्षी शहरातील रस्त्यांची वाट लागते. शहरातील रस्ते सुस्थितीत राहवेत, यासाठी दरवर्षी मान्सूनपूर्व रस्ते खोदाई थांबवली जाते. यंदाही १५ मे ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सर्व बाह्य संस्था, महापालिकेचे सर्व विभागांकडील भूमिगत सेवावाहिन्यांसाठी प्रत्यक्ष रस्ते खोदाईचे काम बंद ठेवण्यात येऊन, खोदलेले रस्ते तातडीने पूर्ववत करण्यात यावेत, असे आदेश आयुक्तांनी दिले होते. या नियमावर बोट ठेवून महापालिकेने इतर अनेक शासकीय विभाग व खासगी कंपन्यांचे खोदकामाची परवानगी नाकारली. मात्र, स्मार्ट सिटी कंपनीच्या कामासाठी विशेष परवानगी देण्यात आली आहे.

स्मार्ट सिटीकडून फायबर ऑप्टिकल केबल नेटवर्कचे काम रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीला दिले आहे. या कामाचे अनेक वर्षांपासून भिजत घोंगडे आहे. त्यातच ऐन पावसाळ्यात या ठेकेदार कंपनीला म्हणजेच १९ जून २०२६ ला ३८ किलोमीटर रस्ते खोदाईची विशेष परवानगी देण्यात आली आहे. स्मार्ट सिटी कंपनीचे महाव्यवस्थापक मनोज सेठिया यांनी ही परवानगी दिली. सल्लागार, आयुक्तांच्या मान्यतेने काही अटी-शर्ती टाकून ही परवानगी दिली गेली. परंतु, यावरून रस्ते खोदाईबाबतचे प्रशासनावर दुटप्पीपणा आरोप होत आहे.



### अटी, शर्तीसह परवानगी दिल्याचा दावा

**» स्मार्ट सिटी कंपनीअंतर्गत आवश्यक फायबर केबल टाकण्यासाठी संबधित कंपनीला आयुक्तांच्या मान्यतेने ही परवानगी दिली आहे. त्यांना खोदकाम व केबल टाकताना सर्व खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. अटी व शर्तीसह परवानगी दिली आहे. काही महिने शासनाकडून स्थगिती आदेश असल्यामुळे हे काम करण्यास विलंब झाला, अवे स्मार्ट सिटीचे महाव्यवस्थापक तसेच, महापालिकेचे सहशहर अभियंता मनोज सेठिया यांनी सांगितले.**

# पुण्यातील दिशादर्शक फलकांचे होणार पुनरुज्जीवन?

## झाडे, सिग्नल आणि फिकट झालेल्या अक्षरांमुळे फलकांचा उपयोग कमी; महापालिकेने देखभाल व अद्ययावतीकरणावर भर देण्याची नागरिकांची अपेक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

शहराबाहेरून शहरात आलेल्या तसेच शहराच्या वेगवेगळ्या भागात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना मुख्य रस्त्यावरून जाताना वेगवेगळ्या भागांची दिशा तसेच त्या भागातील माहिती मिळावी या उद्देशाने महापालिकेकडून दरवर्षी लाखो रुपये खर्चून दिशादर्शक फलक तसेच बोर्ड लावण्यात येतात. मात्र, शहरातील अनेक फलकच दिशाहीन झाले आहेत. अनेक भागांमध्ये फलकांच्या पुढेच झाडांची वाढ झालेली आहेत.

तर काही ठिकाणी थेट वाहतुकीचे सिग्नलच या फलकांना आडवे आले आहेत. त्यामुळे या फलकांवरील माहितीच दिसत नाही. तर अनेक फलकांचा रंग तसेच अक्षरी पुसली गेल्याने अथवा ते अर्धवट तुटलेले असल्याने ते वाचताच येत नसल्याचे चित्र शहरभर आहे. शहरात महापालिकेकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्चून दिशादर्शक फलक लावले जातात. त्यावर पुढे कोणता भाग आहे.

तसेच, त्या भागातील प्रमुख ठिकाणांची माहिती असते त्यामुळे प्रवाशांना रस्ते लक्षात येऊन इच्छितस्थळी वेळेत पोहचता येते. महापालिका दरवर्षी पथ विभाग, प्रकल्प विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून असे फलक लावते. मात्र, ते एकदा लावल्यानंतर त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. त्यातच, अनेकदा हे फलक नगरसेवकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून लावण्यात आलेले असल्याने त्यावर त्यांचे नावही असते.

मात्र, सार्वत्रिक निवडणुकांच्या काळात आदर्श आचारसंहितेत ही नावे झाकली जातात मात्र अनेकदा पूर्ण फलकच झाकला जातो. त्यामुळे निवडणुका संपल्यानंतर असे दिशादर्शक फलक पूर्ण पूर्ववत करणे अपेक्षित असते. मात्र, अनेक ठिकाणी ते झाकलेले असल्याने नागरिकांना त्याचा काहीच उपयोग होत नसल्याचे चित्र आहे.

एकीकडे शहरातील दिशादर्शक फलक अडथळ्यांमुळे नागरिकांना दिसत नाही आणि त्यावरील माहिती समजणे कठीण जात असतानाच दुसरीकडे मात्र चार महिन्यांपूर्वी निवडून आलेल्या नगरसेवकांच्या नावाचे फलक मात्र एकदम चकाचक आणि अडथळारहित आहे. उलट नगरसेवकांचे फलक चौकातून कोणत्याही दिशेने सहज दिशेने दिसतील आणि त्याच्या समोर सिग्नल, झाड अथवा इतर कोणतेही अडथळे येणार नाहीत याची खबरदारी मात्र प्रशासनाने प्रामाणिकपणे घेतली असल्याचे पाहायला मिळते.





### दिशादर्शक फलकांचा उद्देशच धोक्यात

**» शहरात बाहेरून येणारे नागरिक, पर्यटक आणि वाहनचालकांना योग्य दिशा मिळावी म्हणून महापालिका दरवर्षी लाखो रुपये खर्चून दिशादर्शक फलक उभारते. मात्र अनेक ठिकाणी फलक झाडांच्या फांद्यांआड गेले आहेत, तर काही ठिकाणी वाहतूक सिग्नल किंवा इतर अडथळ्यांमुळे ते स्पष्ट दिसत नाहीत. त्यामुळे फलकांचा मूळ उद्देशच साध्य होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. नियमित देखभाल, छाटणी आणि फलकांची योग्य ठिकाणी पुनर्स्थापना करण्याची मागणी होत आहे.**

### नियमित देखभाल आवश्यक

**» दिशादर्शक फलक उभारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच त्यांची नियमित देखभालही आवश्यक आहे. नव्याने फलक बसविण्याबरोबरच त्यांची स्वच्छता, रंगकाम, तुटलेल्या भागांची दुरुस्ती आणि झाडांच्या फांद्यांची वेळोवेळी छाटणी केल्यास नागरिकांना त्याचा अधिक फायदा होऊ शकतो. शहरात वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट आणि सुस्थितीत असलेली दिशादर्शक व्यवस्था ही स्मार्ट सिटीच्या दृष्टीने महत्त्वाची बाब मानली जात असून याकडे प्रशासनाने प्राधान्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

### रंग उडाला, अक्षरे पुसली

**» शहरातील अनेक दिशादर्शक फलकांचा रंग उडालेला असून अक्षरे फिकट झाल्यामुळे माहिती वाचणे कठीण झाले आहे. काही फलक तुटलेल्या अवस्थेत असून अनेक ठिकाणी निवडणुकांच्या काळात झाकलेले फलक आजही पूर्ववत करण्यात आलेले नाहीत. परिणामी नागरिक आणि बाहेरून येणाऱ्या वाहनचालकांना योग्य मार्ग शोधताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. कालबाह्य आणि खराब झालेल्या फलकांचे सर्वेक्षण करून त्यांचे नूतनीकरण करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.**

# पुण्यात पाणीटंचाई तीव्र; 1500 तक्रारी दाखल, 400 खासगी टँकरद्वारे पुरवठा सुरू

## दिवसाआड पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; टँकरच्या दरांवर नियंत्रणासाठी महापालिकेकडून नवी नियमावली तयार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात दिवसाआड पाणीपुरवठ्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर नागरिकांच्या अडचणी वाढल्या असून, पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. कमी दाबाने पाणी येणे, नियोजित वेळेत पाणी न मिळणे तसेच टँकरची गरज भासणे या कारणांमुळे महापालिकेकडे दाखल होणाऱ्या तक्रारींची संख्या आतापर्यंत १५०० वर पोहोचली आहे. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महापालिकेने टँकरच्या फेऱ्यांमध्ये वाढ केली आहे.



महापालिकेच्या स्वतःच्या टँकर बरोबरच खासगी टँकरचीही मदत घेण्यात येत असून, शहरातील विविध भागांना त्यांच्यामार्फत पाणीपुरवठा केला जात आहे. पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या ४०० खासगी टँकर महापालिकेच्या पाणी भरणा केंद्रांवरून पाणी घेऊन शहरात पुरवठा करत आहेत

या टँकरद्वारे दररोज १६०० ते १७०० फेऱ्या केल्या जात आहेत. महापालिकेकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मोफत टँकरच्या मागणीतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे उपलब्ध टँकर व्यवस्था आणि मनुष्यबळावर अतिरिक्त ताण निर्माण झाला असून, अनेक भागांत टँकर वेळेवर पोहोचत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

नागरिकांच्या मागणीनुसार मोफत टँकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच टँकरच्या फेऱ्या वाढविणे, पाणीपुरवठा अधिक कार्यक्षम करणे आणि खासगी टँकरच्या दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचेही विभागाने सांगितले.

### दरांवर नियंत्रणासाठी नवी नियमावली

**» महापालिकेच्या पाणी भरणा केंद्रांवरून पाणी घेणारे काही खासगी टँकर चालक अंतर आणि मागणीनुसार १२०० ते ३००० रुपयांपर्यंत शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. या मनमानी दरांवर नियंत्रण आणण्यासाठी महापालिकेकडून नवीन नियमावली तयार करण्याचे काम सुरू असून, टँकर दरांचे नियमन करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे.**

# पीएमपी बस प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विमा व्यवस्थेवर भर

## विमा, सुरक्षा आणि पारदर्शकतेबाबत सविस्तर माहिती सादर करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमपीएमएलच्या स्वतःच्या मालकीच्या तसेच भाडेतत्त्वावरील बसेस आणि इतर वाहनांचा विमा काढण्यात आला आहे की नाही, याबाबतची माहितीच प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. नगरसेवक राजेंद्र काकडे यांनी महापालिकेच्या जून महिन्याच्या मुख्यसभेत याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर पीएमपीएमएलकडील माहिती अप्राप्त असे मोघम उत्तर देण्यात आले आहे.

त्यामुळे, शहरात दररोज २ हजार बस तब्बल १० लाख प्रवाशांना घेऊन फिरत असताना एवढ्या गंभीर विषयाची माहिती पीएमपीकडे नाही का, असा प्रश्न पुढे आला आहे. काकडे यांनी पीएमपीएमएलच्या वाहनांच्या विम्यासंदर्भात अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले होते. कंपनीच्या मालकीच्या व भाडेतत्त्वावरील सर्व वाहनांचा विमा काढण्यात आला आहे का, कोणत्या प्रकारचा विमा घेतला जातो,

विमा नसलेली वाहने कोणती, विम्याची खातरजमा करण्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे, तसेच विमा नसलेल्या वाहनाचा अपघात झाल्यास नुकसानभरपाईची जबाबदारी कोणाची राहते, याची माहिती त्यांनी मागितली होती. याशिवाय, विमा नसताना वाहन रस्त्यावर धावल्यामुळे अपघात झाल्यास आतापर्यंत किती नागरिकांना नुकसानभरपाई देण्यात आली,

त्यासाठी किती रक्कम अदा करण्यात आली आणि संबंधित ठेकेदार किंवा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली, अशीही विचारणा करण्यात आली होती. मात्र, या सर्व उपप्रश्नांना प्रशासनाने एकच उत्तर दिले. पीएमपीएमएलकडून आवश्यक माहिती प्राप्त झालेली नसल्याने कोणतीही आकडेवारी किंवा तपशील उपलब्ध नसल्याचे उत्तरात नमूद केले आहे.

पीएमपीची सेवा पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत दिली जात असल्याने राज्यशासनाने पीएमपीची संचलन तूट देण्याची जबाबदारी पुणे महापालिका तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेवर दिली आहे. त्यात, ६० टक्के तूट पुणे महापालिका देते तर ४० टक्के तूट पिंपरी-चिंचवड महापालिका देते मागील वर्षी पुणे महापालिकेने सुमारे ४५० कोटी रुपयांची संचलन तूट दिली आहे. त्यामुळे पीएमपीच्या संचलनात महापालिकेचा हिस्सा असतानाही महापालिकेच्या नगरसेवकांनी विचारलेली माहिती देण्यास पीएमपी प्रशासनाकडून वारंवार टाळाटाळ केली जात आहे.



### दररोज १० लाख प्रवाशांची सुरक्षितता महत्त्वाची

**» पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात पीएमपीएमएलच्या सुमारे दोन हजार बस दररोज दहा लाखांहून अधिक प्रवाशांची वाहतूक करतात. अशा परिस्थितीत प्रत्येक बसचा वैध विमा, चालकांची जबाबदारी आणि अपघाताच्या वेळी नुकसानभरपाईची स्पष्ट व्यवस्था असणे अत्यावश्यक मानले जाते. विम्यासारख्या मूलभूत बाबींची अद्ययावत माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे समोर आल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेसंदर्भात अधिक प्रभावी आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याची गरज व्यक्त होत आहे.**

### नगरसेवकांनी उपस्थित केले महत्त्वाचे प्रश्न

**» पीएमपीएमएलच्या मालकीच्या आणि भाडेतत्त्वावरील सर्व बस व इतर वाहनांचा विमा काढण्यात आला आहे का, विम्याचा प्रकार कोणता आहे, विमा नसलेली वाहने किती आहेत, विम्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे, तसेच अपघात झाल्यास नुकसानभरपाईची जबाबदारी कोणाची राहते, अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची विचारणा नगरसेवक राजेंद्र काकडे यांनी केली. मात्र, या सर्व प्रश्नांवर पीएमपीएमएलकडून आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तर देण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**

### महापालिकेकडून शेकडो कोटींचा निधी

**» पीएमपीएमएलच्या संचलन तुटीची जबाबदारी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका संयुक्तपणे उचलतात. त्यानुसार ६० टक्के आर्थिक भार पुणे महापालिका, तर ४० टक्के पिंपरी-चिंचवड महापालिका उचलते. मागील वर्षी पुणे महापालिकेने सुमारे ४५० कोटी रुपयांची आर्थिक मदत दिली होती. एवढा सार्वजनिक निधी खर्च होत असताना पीएमपीएमएलने आर्थिक, प्रशासकीय आणि सुरक्षाविषयक माहिती वेळेवर उपलब्ध करून पारदर्शकता राखावी, अशी अपेक्षा लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.**

---

# टीईटी परीक्षेची नवी तारीख काय? परीक्षा परिषदेने दिली माहिती...

## पेपर फुटल्याचा प्रकार भिवंडी येथे उघडकीस आल्यानंतर समाजमाध्यमांत परीक्षेच्या सुधारित दिनांकाबाबत बनावट परिपत्रक फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहराबाहेरून शहरात आलेल्या तसेच शहराच्या वेगवेगळ्या भागात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना मुख्य रस्त्यावरून जाताना वेगवेगळ्या भागांची दिशा तसेच त्या भागातील माहिती मिळावी या उद्देशाने महापालिकेकडून दरवर्षी लाखो रुपये खर्चून दिशादर्शक फलक तसेच बोर्ड लावण्यात येतात. मात्र, शहरातील अनेक फलकच दिशाहीन झाले आहेत. अनेक भागांमध्ये फलकांच्या पुढेच झाडांची वाढ झालेली आहेत.

तर काही ठिकाणी थेट वाहतुकीचे सिग्नलच या फलकांना आडवे आले आहेत. त्यामुळे या फलकांवरील माहितीच दिसत नाही. तर अनेक फलकांचा रंग तसेच अक्षरी पुसली गेल्याने अथवा ते अर्धवट तुटलेले असल्याने ते वाचताच येत नसल्याचे चित्र शहरभर आहे. शहरात महापालिकेकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्चून दिशादर्शक फलक लावले जातात. त्यावर पुढे कोणता भाग आहे.

तसेच, त्या भागातील प्रमुख ठिकाणांची माहिती असते त्यामुळे प्रवाशांना रस्ते लक्षात येऊन इच्छितस्थळी वेळेत पोहचता येते. महापालिका दरवर्षी पथ विभाग, प्रकल्प विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून असे फलक लावते. मात्र, ते एकदा लावल्यानंतर त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. त्यातच, अनेकदा हे फलक नगरसेवकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून लावण्यात आलेले असल्याने त्यावर त्यांचे नावही असते.

मात्र, सार्वत्रिक निवडणुकांच्या काळात आदर्श आचारसंहितेत ही नावे झाकली जातात मात्र अनेकदा पूर्ण फलकच झाकला जातो. त्यामुळे निवडणुका संपल्यानंतर असे दिशादर्शक फलक पूर्ण पूर्ववत करणे अपेक्षित असते. मात्र, अनेक ठिकाणी ते झाकलेले असल्याने नागरिकांना त्याचा काहीच उपयोग होत नसल्याचे चित्र आहे.



### टीईटी परीक्षेबाबत अधिकृत माहिती कुठे मिळेल?

**» शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भातील सर्व अधिकृत माहिती केवळ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावरच प्रसिद्ध केली जाणार आहे. परीक्षेचा सुधारित दिनांक, प्रवेशपत्र, सूचना किंवा इतर कोणतेही परिपत्रक समाजमाध्यमांवर व्हायरल होत असल्यास त्यावर विश्वास ठेवू नये, असे परिषदेने स्पष्ट केले आहे. उमेदवारांनी कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी तिची अधिकृत खातरजमा करावी. अफवा किंवा बनावट परिपत्रकांमुळे दिशाभूल होण्याची शक्यता असल्याने केवळ अधिकृत प्रसिद्धिपत्रके आणि संकेतस्थळावरील माहितीलाच प्रमाण मानण्याचे आवाहन परीक्षा परिषदेने केले आहे.**